Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# भाववाढ - भारतीय अर्थव्यवस्थेत एक समस्या आणि उपाय योजना

**प्रा. डॉ. गिऱ्हे सुधाकर शामराव**
अर्थशास्त्र विभाग,
मत्स्योदरी महाविद्यालय, तिर्थपुरी,
जि. जालना

भाववाढ ही भारती अर्थव्यवस्थेत भारत हा कृषीप्रधान व लोकशाही प्रणालीचा देश आहे. भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. या देशा समोर महत्वाचे आव्हाने समोर आहेत ते म्हणजे लोकसंख्या, दारिद्रय, बेकारी आणि भाववाढ होय, या आव्हानां पैकी भाववाढ आणि दारिद्रय या दोन विषयाबाबत सर्वत्र चर्चा सुरू आहे. विषयी आपण विचार करूया

देशाच्या विकासाच्या दृष्टीने भाववाढ आणि चलन घटीची समस्या या समस्या अथव्यवस्थेमध्ये येणे योग्य नाही. भाववाढ आणि आर्थिक विकासाचा दर यामध्ये सरळ संबंध नाही १९९० ते १९९४ या कालावधीत अर्थिक विकासाचा दर फक्त ४.८ टक्के होता परंतु भाववाढीचा दर मात्र ११.०५ टक्के होता या उलट दहाव्या पंचवार्षिक योजनेत आर्थिक विकासाचा दर अधिक असूनसुध्दा भाववाढीचा दर मात्र कमी होता त्यामुळे भाववाढ आणि विकासाचा दर यांचा सरळ संबंध आहे. असे म्हणता येणार नाही. मात्र काही अर्थशास्त्रंज्ञांच्या मते मात्र आर्थिक विकासाचा दर आणि भाववाढ यांचा संबंध आहे. त्यांच्या मते आर्थिक विकासामुळे लोकांचे जीवनमान उंचावले व त्यामुळे वस्तुच्या मागणीत वाढ होवून भाववाढ होते भाववाढीच्या कारणाचा विचार केला असता ती भाववाढ ही पुढील कारणामुळे होते.

१) चलन पुरवठ्यात वाढ

२) विविध वस्तू व सेवांच्या उत्पादन खर्चातील वाढीमुळे

३) देशामधील प्रशासकीय अडचणीमुळे भाववाढ होत असते.

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये चलन पुरवठ्यात वाढ झाल्यामुळे भाववाढ निर्माण झालेली आहे. ही चलन वाढ देशांच्या अर्थव्यवस्थेत व्यापारचक्रांचे अस्तित्व आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आढळून येते अनेक वेळा वस्तूच्या किंमती ह्या खुप वाढतात. अर्थशास्त्रज्ञ क्राऊथर म्हणतात ''ज्या अवस्थेत मुल्यस्तरात वाढ होते आणि मुद्रेच्या मुल्यात घट होते अशा अवस्थेला स्फिती असे म्हणतात''.

भाववाढ का निर्माण होते तर जेव्हा सरकारद्वारे तुटीच्या अर्थसंकल्पामुळे संकल्पना अंदाजपत्रक उत्पन्नापेक्षा अधिक खर्च दाखविला जातो? सरकार विविध योजनावर खर्च अधिक करते आणि भारत सरकार तृटीचा अर्थसंकल्प मांडत असल्यामूळे उत्पन्ना पेक्षा खर्च जास्त होणे त्यामुळे परिणाम म्हणून चलनवाढ होते देशाच्या अर्थव्यवस्थेतील उद्योग क्षेत्रात उत्पादनाच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन देशतील श्रमीकाच्या वेतनात वाढ होते आणि जनते जवळील पैशाच्या प्रमाणत वाढ होते. भारतीय अर्थव्यवस्थेत औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उत्पादन वाढत आहे. भांडवलासाठी लागणारे भांडवल खेळते आणि स्थिर या प्रकारातील आहे. या भांडवलासाठी पैसा किंवा धनादेश वापरले जातात त्यामुळे अर्थिक व्यवहारात पैसा व धनादेशाच्या प्रमाण वाढत असल्यामुळे भाववाढ होत आहे. तसेच चलनातील पैशाचे प्रमाण वाढत आहे. उत्पादराच्या किंमतीत वाढ, सुवर्ण साठ्यात वाढ तसेच सरकरच्या निर्णयात धोरणात्मक निर्णय घेणे अवघड जाते. त्यामुळे योग्य निर्णय न घेतल्यामुळे भाववाढीचा प्रश्न निर्माण होत असल्याचे दिसून येते.

**भाववाढीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम**

१) भाववाढीमुळे भाववाढीचा फायदा उत्पादकाला होतो तर भाववाढीची झळ ग्राहकांना बसते.

२) कृषी/शेती आणि औद्योगिक उत्पादनाच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे त्या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना वेतनवाढ द्यावी लागते याचा परिणाम परत चलन वाढीत होतो.

३) भाग बाजारात भागाच्या किंमती वाढतात

४) भाववाढीमुळे नवीन खर्च वाढत आहे. परंतु मजुरी मात्र कायम आहे. त्यामुळे क्रयशवस्ती (बचत) घसरत आहे.

५) शेकऱ्यांना कृषी उत्पादीत मालाच्या वाढलेल्या किंमतीतून अतिरिक्त लाभ प्राप्त होतो व त्याचा उपयोग शेतकरी दिर्घकालीन सुधारणा बरोबर शेती तंत्र खरेदी करत असतात.

६) तेजीत ऋणाची मागणी वाढत असल्यामुळे व्याजदरात वाढ होत आहे. तसेच भाववाढीमुळे चलनाचे मूल्य कमी होत आहे.

या भाववाढीच्या बाबत प्रा.सी.एन.वकील यांनी म्हटले आहे की, मुद्रास्फिती मुळे संपूर्ण समाजाचे नुकसान होते. परंतु स्फिती फायदेशीर असल्यानले दरोडेखोरास पकडून न्यायालयात खेचण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही हे विधान बरेच प्रसिध्द आणि महत्वपुर्ण आहे.

**भाववाढीवरील उपाय :**

अर्थव्यवस्थेतत चलन पुरवठा वाढल्यास त्यामुळे वस्तू आणि मागणीत वाढ होऊन भाववाढ होऊ शकते अर्थव्यवस्थेतील चलन पुरवठा नियंत्रित करण्याकरिता आर.बी.आय.

अधिकार क्षेत्रात सी.आर.आर.आर,ई.पी.ओ. आणि क्रेडीट कन्ट्रोल या तीन साधनांचा वापर केला जातो. आज पर्यंत भारतीय आर.बी.आय ने तीन वेळा सी.आर.आर. आणि रेपो मध्ये तीन वेळा वाढ केलेली आहे.

**अन्य उपाय योजना**

१) भाववाढ कमी करण्यासाठी शेती, उद्योग, यामधून निर्माण होणाऱ्या वस्तूची आयात करणे म्हणजे उपभोग्य वस्तूचे उत्पादन वाढवून त्या वस्तू कमी किंमतीत उपभोगत्यांना उपलब्ध करून देणे.

२) शेअर बाजारा वरील व्यवहारावर मोठ्या प्रमाणात बंधने लादली जातील त्यामुळे मोठ्या प्रमाणात लाभ प्राप्त करण्याच्या प्रवृत्तीस आळा असला पाहिजे.

३) भाववाढ नियंत्रण ठेवण्यासाठी उत्पादीत वस्तूचे वितरण हे स्वस्त धान्य प्रणालीद्वारे करण्यात आले पाहिजे.

४) वस्तुचे उत्पादन होण्यासाठी वस्तुच्या किंमती आधारभुत करण्यात याव्यात जेणे करून आवश्यक वस्तुचे उत्पादन अर्थव्यवस्थेत मुबलक प्रमाणात होऊन उपभोग्य वस्तुची टंचाई निम्राण होणार नाही.

५) देशाच्या अर्थव्यवस्थेत चलनाचे प्रमाण कमी करण्यासाठी जनतेकडून पैसा परत होण्यासाठी ऐच्छिक बचतीला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. तसेच कराचे प्रमाण वाढविणे जनतेकडून कर्ज घेणे आणि खुल्या बाजारात रोख विक्री करून सरकारने भाववाढ कमी केली पाहिजे वित्तीय तुट कमी करणे महसुल खर्चावर नियंत्रण आणने तुटवडा असलेल्या वस्तुंच्या निर्यातीवर बंधन आणने गरजेचे आहे तसेच वस्तुचा उत्पादन खर्च कमी करणे अशा प्रकारे सध्या भाववाढीवर केंद्रसरकारने उपाय योजना करणे आवश्यक आहे.

जगामधील कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये तेजीची अवस्था निर्माण होते देशाचा अर्थिक विकास करत असतांना देशातील विविध क्षेत्रासाठी सरकारकडून गुंतवणुक करण्यात येते याद्वारे उत्पादनाच्या सर्वच घटकांना एकत्रित करून उत्पादन प्रक्रिया सुरू करण्यात येते त्यातुन उत्पादन सुरू होते उत्पादन हे समाजासाठी उपभोग्य प्रक्रिया सुरू करण्यात येते त्यातून उत्पादन सुरू होते उत्पादन हे समाजासाठी उपभोग्य असते म्हणून उपभोग्य वस्तुंची खरेदी करण्यात येते वस्तुंच्या पुरवठ्यामध्ये घट झाल्यास त्याच वस्तु खरेदी उपभोगाकरीता समाज प्रयत्न करतो वस्तुच्या किंमतीमध्ये ह्या वस्तुची खरेदी करतो. त्यास भाववाढ म्हणतात. या भाववाढीचे नियंत्रण हे आवश्यक असते.

भाववाढ ही देशाच्या आर्थिक समस्यापैकी एक महत्वाची समस्या आहे. भाववाढीच्या संदर्भात दरवर्षी अंदाजपत्रक सादर करतांना आढावा घेतला जातो आणि सरकारने या संदर्भात केलेल्या उपाय योजनाची माहिती दिली जाते १९५० पुर्वी डॉ.माल्थस यांनी अर्थिक अरिष्टा बाबत. विवेचन केले होते आर्थिक अरिष्ठ म्हणजे व्यापार चक्र होय. तेजीच्या काळात वस्तुच्या किंमतीत वाढ होते आणि उत्पादनात घट होणे समाजाची उपभोग्य वस्तुची मागणी अचानक वाढणे आणि उत्पादन कायम राहणे त्यामुळे समाजाची गरज पुर्ण होत नाही तेजीचे चित्र निर्माण होते चलन वाढीमुळे रोजगारावर व उत्पादनावर वाईट परिणाम होतो तेव्हा ही चलन वाढ योग्य नसते.

**संदर्भ सुची**

१) लोकमत सकाळ २०१०—११

२) माहिती व जनसंपर्क महासंचनानयाचे महाराष्ट्रशासन जालना यांचा चौफेर विकास माहिती पुस्तिका

३) आर्थिक सर्व्हे १९९८—९९

४) नियोजन आयोग १० वी पंच वार्षिक योजना २००२—०६